ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-III October 2012

# किनवट तालुक्यातील बंजारा समुदायाचे सांस्कृतिक पैलुचे समाजशास्त्रीय अभ्यास

**दशरथ जाधव,**
**सहाय्यक प्राध्यापक,**
**समाजशास्त्र विभाग,**
**एस. एन. डी.टी. महिला विद्यापीठ,**
**मुंबई.**

***सारांश :***

मराठवाडयात एकुण आठ जिल्हे आहेत पैकी नांदेड एक जिल्हा आहे. किनवट तालुका हे नांदेड जिल्हयात असुन नांदेड पासुन 145 कि. मि. अंतरावर वसलेले आहे. किनवट तालुका हा महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील मागासलेला आणि एकमेव असा आदिवासी तालुका होय. या तालुक्यात बंजारा समुदायाचे अस्तित्व सुध्दा प्राचीन काळापासुन अबाधित आहे. बंजारा समुदाय म्हणजे कलरफुल कल्चर आहे. या समुदायाचा सांस्कृतिक पैलुवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न.

**मुख्य संज्ञा : बंजारा समुदायातील सांस्कृतिक पैलु**

**प्रास्ताविक –**

बंजारा समुदायाचे संदर्भ सिंधू संस्कृतीतून मिळते असे प्र. रा. देशमुख यानी आपल्या"सिंधू संस्कृती ऋग्वेद व हिन्दु संस्कृति " या ग्रंथात सांगीतले आहे. कै. बळीराम पाटील यानी आपल्या "गोरबंजारा लोकांचा इतिहास" या ग्रंथात ही जमात आर्यच आहे असे सांगीतले आहे. या जमातीचा बौध्दकालीन संदर्भ डॉ. नलीनीदत्त यानी दिले आहे. बंजारा समुदायाचे प्राचीन व्यवसाय "लदेणी" करणे होते. पूर्वी बैलाच्या पाठीवर मीठ वाहण्याचे काम करीत होते. प्राचीन काळापासुन बंजारा समुदाय भारतात आहे व तेव्हा त्याचा समावेश क्षेत्रीय वंशात होता, पण या संदर्भाचा इतिहास अपूर्ण आहे. असे प्रा. मोतीराम राठोड नी आपल्या "जागतोरेस" या ग्रंथात म्हटले आहे या समुदायाला देशाच्या वेगवेगळया राज्यात भिन्न – भिन्न प्रवर्गात समाविष्ट करण्यात आलेले आहे. उदा. महाराष्ट्रात विमुक्त जाती ( VJ ) आंध्रप्रदेशात ( S.T ) अनुसुचीत जमाती, दिल्लीत अनुसुचीत जाती ( SC ) काही राज्यात हया समुदायाला शासनाच्या कोणत्याही सुचीत समाविष्ठ करण्यात आलेले नाही. उदा. मणीपूर, मेघालय, मिजोराम, केरळ,

जम्मु – काश्मीर, छत्तीसगढ, अरूणाचल प्रदेश इ. म्हणुन त्याना शासनाच्या विविध योजना पासुन वंचीत राहावे लागते.

**बंजारा समुदायाची व्याख्या –**

बंजारा समुदायाला विविध नावाने ओळखले जाते. उदा. लमाण, लबान, गोर, लम्बाडी, सुगाली, नाईक, सिरकीबन्द इत्यादी.

डॉ. रूक्मीणी पवार यानी "बंजारा लोक जीवन पध्दती" या आपल्या ग्रंथात बंजारा म्हणजे कोण ? हया प्रश्नाचे उत्तर खालील प्रमाणे दिले आहे. "ज्यांच्यामध्ये भाषीक साधर्म्य आहे, वेशभुषेच्या आणि सणसमारंभाच्या कल्पना समान स्वरूपाच्या आहेत अशा समुहाला लमाण – बंजारे म्हणतात ""जे लोक तांडा संस्कृतिशी एकरूप झालेले आहेत देवीदेवता विषयीच्या कल्पना समान स्वरूपाच्या आहेत. जादु – टोणा भुतखेतांवर विश्वास ठेवणारा व पोशाखाच्या संदर्भात वेगळेपण दाखवणारा समुदाय म्हणजे लमाण – बंजारा समाज होय." ( पवार – २००५ )

"गोरमाटी संस्कृती आणि संकेत" या पुस्तकात भिमणीपुत्र मोहननाईक यांना बंजारा पेक्षा गोरमाटी हे नाव सत्य आहे असे वाटते. त्यांच्यामते 'गोरमाटी' हा शब्द पशुपालक या अर्थाने रूढ झाला. गौरी आणि शिव पासुन उत्पन्न झालेला 'गण' म्हणजे 'गोरगण' किंवा गौरीपासुन उत्पन्न झालेला माणुस 'गोरमाटी' हा अर्थ सर्वात जास्त सोयीस्कर वाटतो. गोरमाटी समुदायातील व्यक्तिंनाही जमात 'गोर' म्हणते व इतरांना 'कोर' म्हणतात. "गायी–गुरांची खिल्लारे बाळगणारे ते लोक गोरमाटी" पशुपालक या अर्थाने गोरमाटी हा शब्द प्रचलीत झाला.

**संशोधनाची उदिष्टये –**

1. किनवट तालुक्यातील बंजारा समुदायाच्या वैविध्यपूर्ण अषा सांस्कृतिक जीवनाची माहीती घेणे.
2. बंजारा समुदायातील धार्मीकतेची वेगळी अषी ओळख करून घेणे.
3. बंजारा समुदायाची सण साजरे करण्याची स्वंतत्र अषी पध्दती जाणुन घेणे.

**तथ्य विश्लेषण –**

किनवट तालुक्यातील बंजारा समुदायाच्या सांस्कृतिक पैलुचा अभ्यास करताना विविध बाबतीत भिन्न – भिन्न निष्कर्ष प्राप्त झालेले आहेत. बंजारा समुदायाचे एकुण जीवनमान कशा पध्दतीचे आहेत हे शोधण्याचे प्रमुख काम या संशोधना मार्फत केले गेले. मुलाखती मार्फत अनेक निष्कर्ष निघालेत.

बंजारा संस्कृती म्हणजे "कलर फुलकल्चर" असेच म्हणत. कारण त्यांचा रंगीबेरंगी पेहराव, विशिष्ट प्रकारची आभुषणे आदीमुळ बंजारा स्त्रिया पांरपारीक पेहरावात रंगीबेरंगी दिसत. आज सुध्दा ती प्रथा तो रंगीबेरंगी पांरपारीक पेहराव अस्तित्वात आहे का ? असे विचारले असता 77 टक्के प्रतीसादकानी पांरपारीक पेहरावा पेक्षा साडीला पंसती दिली. त्यावरून असे निष्कर्ष निघतो की पांरपारीक पेहराव कालबाहय होत चालला असुन त्याची जागा साडीनी घेतली आहे.

बंजारा समुदायाचा पांरपारीक लदेणीचा व्यवसाय बंद होऊन शेतीप्रमुख व्यवसाय झालेला आहे. असे निष्कर्ष निघाले. या समुदायात दिवाळीला मेरा मागण्याची प्रथा आहे. मेरा मागण्याची ही प्रथा तेवढयाच उत्साहाने साजरी केली जाते असे 67.33 टक्के प्रतिसादकानी प्रतिक्रिया दिली.

बंजारा समुदायात होळी या सणाला अतिशय आगळे – वेगळे महत्व आहे. या सणात लेंगी ( होळीगीते ) म्हणण्याची प्रथा अस्तित्वात आहे. एक महिना आधीपासुन बैठी लेंगी गायल्या जात होती. आज ही प्रथा लोप पावत चालली आहे पण होळीत लेंगीला महत्व असते असे निश्कर्ष निघते.

बंजारा समुदायात विवाह पध्दतीचे आगळे वेगळे वैशिष्टये आहे. लग्नानंतर निरोप देताना नववधु गीत म्हणत रडते आणि सर्वाना निरोप देते. ही रडण्याची प्रथा म्हणजे 'हवेली' आणि 'मळेर'. ही प्रथा अजुन ही कायम असल्याचे निष्कर्ष निघतो. पुर्वी लग्नात खुप रडण्याची प्रथा होती पण आज त्याचे प्रमाण कमी झाले आहे. पुर्वी भटकंतीची अवस्था असल्यामुळे लग्नानंतर कधी, कुठे भेट होईल ? किंवा नाही असेच होते. एका ठिकाणी वास्तव्य करून राहणे शक्य नव्हते म्हणुन स्त्रिया खुप रडत. पण आज बंजारा समुदायाची भटकंती संपुन स्थिर जीवनास सुरूवात झालेली आहे.

या समुदायात मनोरंजनाची विविध पांरपारीक साधने उपलब्ध होती उदा. लग्न विधीत मनोरंजन करून घेणे, भजन, किर्तन, गीत, गायन, शुर – विरांच्या कथा, सावत्र आईची कथा, इ. पण आज मनोरंजनाची अत्याधुनीक तंत्रानीही जागा घेतली आणि पांरपारीक मनोरंजनाची साधने लोप पावली.

बंजारा समुदायात 'मळेर' प्रथा अस्तिवात होती. दोन स्त्रिया खुप दिवसानी भेटल्यावर तोंडावर ओडणी झाकुन गळयात गळे घालुन गीत गाऊन व्यथा सांगत असत. ही प्रथा अजुनही काही प्रमाणात अस्तिवात आहे.

बंजारा समुदायात दुस–या दिवशी सकाळी होळी जाळल्या जातात. या पाठीमागे एक आख्यायीका असुन अजुन ही त्याचे पालन केले जाते नायकाच्या अनुमती शिवाय होळी जाळल्यां जात नाही असे 95.67 टक्के प्रतिसादकानी प्रतिक्रिया दिली. म्हणजे बंजारा समुदायात पंरपरेला महत्व असल्याचे दिसते.

**सारांश :**

या संशोधनात बंजारा समुदाय विषयीच्या बाबतीत माहीती गोळा करून निष्कर्श काढण्यात आलेले आहे. हा समुदाय अजुनही आपल्या पांरपारीक शैलीतच जीवन जगत असल्याचे निष्पण्ण होते या समुदायात शिक्षण घेणा–यांची संख्या वाढत आहे. कुटुंबातील जवळपास सर्वच मुले – मुली शिक्षण घेतांना दिसते.

वरील सर्व माहीती किनवट तालुक्यातील निवडक तांडयातून गोळा करण्यात आलेली असुन 11 पंचायत समीती सर्कल मधील 18 तांडयातून मुलाखती घेण्यात आल्या. मिळालेल्या माहीती नुसार निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

**संदर्भसुची –**

1. कै बळीराम पाटील, ( 1773 ) गोरबंजार लोकांचा इतिहास , श्यामब्रदर्स.
2. डॉ. रूक्मीणी पवार, ( 2005 ) बंजारा लोकजीवन पध्दती, कैलास पब्लीकेशन.
3. प्रा. मोतीराम राठोड, ( 2004 ) गोर बंजारा जनजाती एक परिचय, ऑल इंडीया बंजारा सेवासंघ, मुंबई
4. श्री. मोहन नाईक, ( 2000 ) गोरमाटी संस्कृती आणि संकेत, साकेत पब्लीकेशन.
5. श्री. रणजीत नाईक, ( 2004 ) बुधन, महापंडीत सांकृत्यायन प्रतिष्ठान.
6 देवगावकर एस.जी. ( 2000 ) दिबंजारा, कन्सेप्ट पब्लीकेशन.